नुस्ती पुस्तकं वाचून नाही, तर प्रत्यक्ष कामातून आणि माणसांकडून शिकण्याचा एक धडा.

# कर के सिखो




निर्माणमधून निघाल्यानंतर मनात एक गोष्ट पक्की झाली होती की, कृती आणि अभ्यास या परस्परपूरक गोष्टी आहेत. मग नक्की काय करावं याचा विचार करताना तरुण मुलांचा व्यसनाकडे पाहण्याच्या दृष्टिकोन आणि त्यांची मानसिकता याचा अभ्यास करावा, असं ठरवलं. मानसशास्त्र हा माझा अत्यंत आवडीचा विषय आणि व्यसनाधीनता ही जिव्हाळ्याची समस्या त्यामुळे पूर्ण जोशात दोन्हीवर काम करायला सुरुवात केली. 'मुक्तांगण'ची आठवण झाली. माझी शिकण्याची सुरुवात झाली ती मुक्ता पुणतांबेकर यांच्याशी बोलून. त्यांच्या सूचनेप्रमाणे मी मुक्तांगणऐवजी 'निशिगंध' या मुक्तांगणच्या महिलांसाठीच्या व्यसनमुक्ती केंद्रात जायला सुरुवात केली. पहिल्या दिवशी निशिगंधमध्ये गेले तर मलाच थोडंसं विचित्र वाटत होतं. त्यावेळी तिथे खूप तरुण मुली पेशंट म्हणून होत्या. त्यांच्याशी हळूहळू ओळख झाली. मग तिथे बाकीची कामंसुद्धा करावी या विचारांनी मी तिथे भाजी निवडणं, जेवण वाढणं अशा कामात पण मदत करु लागले. मी दर रविवारी तिथे जायचे. त्यावेळी रविवारी त्या सगळ्या जणी एखादा चित्रपट पहायच्या. आमची पहिल्याच दिवशी अशी गट्टी जमली की, ताई तू पुढच्या वेळेस आमच्यासाठी एखादा सिनेमा आण, असं सांगूनही झालं.

या काळात माझ्या डोक्यात एक कुतूहल होतं. लोकांना प्रश्नावली देणं, त्या भरुन घेऊन अभ्यास करणं. मी चांगले २०-२५ प्रश्न काढले. ज्याची उत्तरं त्यांना फार मोठी मोठी लिहायला लागणार होती. मी प्रश्नावली घेऊन गेले; सगळ्यांना दिल्या. त्या मुलींना या सगळ्याची सवय होती. प्रश्नावली त्यांनी पाहिली आणि त्यातल्या चुका मलाच दाखवून दिल्या. प्रश्नावली कशी असावी याचे काही मुद्दे मी त्यांच्याकडून शिकले म्हणा ना!

त्यानंतर मी 'संतुलन' नावाच्या व्यसनमुक्ती केंद्रात परत जवळ जवळ दीड महिना जात होते. कॉलेजच्या मदतीनं सुरु झालेला हा एक कार्यक्रम होता. तिथे आम्ही व्यसनं, व्यसनमुक्ती व विविध मानसिक रोग याबद्दल शिकलो. तिथे लेक्चर कमी व्हायचे. आम्ही बाकी कामं पण करायचो. सुरुवातीला हे काम म्हणजे नसती कटकट वाटायची. आपण इथे शिकायला आलोय; पण आपल्याला धड काही शिकवतच नाहीयेत. इतरच कामं फार असं वाटायचं. पण हळूहळू कळत गेलं की, मी या काळात नकळत खूप काही शिकतेय.

खरंच या प्रवासात मी अभ्यास आणि कृती यांची परस्परपूरकता शिकत गेले. आणि समजत गेले. ही तर सुरुवात होती असं म्हणता येईल. आता अजून पुढची काही ध्येय निश्चिती केली आहेत. त्यांच्याकडे वाटचाल करायला सुरुवात करायची आहे!

**- मृण्मयी अग्निहोत्री**

सौजन्य -'निर्माण'